● रविवार, दि ६ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ७५ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पेट्रोल पंपावर नियमांची पायमल्ली!

## ग्राहकांना असभ्य वागणूक; बॉटलमध्ये पेट्रोल झाले कॉमन; टायरमध्ये हवा, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, तक्रार पेटीसह अन्य सुविधांचा अभाव

**दीपक शेळके**

**जालना** - केंद्र आणि राज्य शासनाने पेट्रोल/डिझेल पंपांसाठी नियमावली तयार केलेली आहे. असे असले तरी अनेक नियम पायदळी तुडविण्यात येत आहेत. शहरातील एखाद अपवाद वगळता सर्वच पेट्रोल पंपांवर प्लास्टिक बॉटलमध्ये बिनधास्त पेट्रोल देण्यात येत आहे. यात सर्वात आघाडीवर जालना बसस्थानक जवळील पेट्रोलपंप आघाडीवर आहे. बस स्थानकाजवळील या पेट्रोल पंपवरील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांना असभ्य वागणुकीचाही सामना करावा लागत आहे. एकापेक्षा अधिक वाहने लाईनमध्ये पेट्रोल घेत असतांना मध्येच ओळखीच्या व्यक्तीला पेट्रोल देऊन शिस्तीत असलेल्या वाहनधारकांना थांबवून एकप्रकारे वेठीस धरण्याचे काम या पंपांवर नेहेमीच होतांना दिसून येते.

शहरातील मुख्य बाजार पेठेत बसस्थानकाजवळ असलेल्या पेट्रोल पंप नियम पायदळी तुडवत सुरु आहे. या ठिकाणी टायरमध्ये हवा भरण्यासाठीची मशीन उपलब्ध आहे मात्र, त्यातून गाड्यांमध्ये हवा भरल्या जात नाही. केवळ नियमात आहे म्हणून हे मशीन या ठिकाणी बसविले असल्याची शक्यता आहे. ग्राहकांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहाची येथे व्यवस्था दिसून येत नाही. किंवा अडगळीत कुठे असेल तर ते स्पष्ट व्हावे अशा आशयाचे या ठिकाणी फलक लावलेले दिसून येत नाही. या ठिकाणी तक्रार पेटीही उपलब्ध नाही. परिणामी ग्राहकांना तक्रार करता येत नाही.

प्लास्टिक बॉटलमध्ये पेट्रोल देण्यासह ग्रामीण भागातून येणाऱ्या वाहनांमध्ये वीस-पंचवीस लीटरचे असलेले कॅन भरून पेट्रोल व डिझेल या ठिकाणाहून सर्रासपणे दिल्या जाते. पेट्रोल पंपांवर असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवरून याची शहानिशा करता येऊ शकते. बॉटलमध्ये पेट्रोल दिल्यामुळे याचा दुरुपयोग होण्याची शक्यता अधिक असते. तर ग्रामीण भागात काही ठिकाणी विना परवाना अनाधिकृतरित्या पेट्रोलची विक्री केल्या जाते. ऐनवेळी पेट्रोल संपल्यास अशा अनाधिकृत दुकानांमधून जादा दराने वाहन धारक पेट्रोल खरेदी करतात. अशा अनाधिकृत दुकानदारांनाही शहरातील काही पेट्रोल पंपांवरून वीस-पंचविस लिटरच्या कॅनमधून पेट्रोल-डिझेलचा पुरवठा होतो.

जालना बसस्थानकाजवळ असलेल्या या पेट्रोल पंपांवर असलेले काही कर्मचारी तर अरेरावीची भाषा ग्राहकांशी करतात.

एका ग्राहकांने युवा आदर्शशी बोलतांना सांगितले की, बसस्थानकाजवळील पेट्रोल पंपावर १६० रुपयांचे पेट्रोल दुचाकी वाहनात भरले. त्यानंतर या बदल्यात ऑनलाईन पेमेंट गुगल पे द्वारे केले मात्र, हे पेमेंट प्रोसेसींगमध्ये गेले या ग्राहकाचे पैसे बँक अकाऊंट मधून डेबिट झालेले होते. ही बाब सदरील कर्मचाऱ्यास लक्षात आणून दिल्यानंतरही या कर्मचाऱ्यांने नगदी १६० रु या ग्राहकाकडुन वसूल केले. त्यानंतर दोन दिवसांनी त्यादिवशी गुगल पे केलेले पेमेंट पेट्रोल पंपावरील संबंधीत कर्मचाऱ्यांस मिळाल्यानंतर पेट्रोल पंपांवर पोहचून ही बाब कर्मचाऱ्याच्या लक्षात आणून दिली. मात्र, ज्या व्यक्तीच्या खात्यावर पैसे ट्रान्सफर झाले होते. सदरील व्यक्ती पंपांवर उपलब्ध नसल्याने या व्यक्तीशी फोनवर संभाषण करुन १६० रुपये डेबिट झाल्याबाबत सांगितले असता त्या कर्मचाऱ्यांने पैसे मिळल्याबाबत होकार देत पंपांवर उपस्थित असलेल्या दुसऱ्या एका कर्मचाऱ्यास फोनवरून १६० रुपयांचे पेट्रोल दुचाकीमध्ये टाकण्यास सांगितले. मात्र, हे दुसरे महाशय भलतेच उर्मट, असभ्य वागणुक देत ग्राहकांला चक्क हाकलून लावले. ही घटना ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी पावने पाच वाजेच्या दरम्यानची आहे.

शहरातील बसस्थानक परिसरातील पंपासह अशा असभ्य वागणुक देणाऱ्या तसेच नियम धाब्यावर बसविणाऱ्या पेट्रोल पंपांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

### पेट्रोल पंपांवरील ग्राहकांसाठीच्या सुविधा...

मोफत हवा चेक करणे व भरणे.
मोफत पिण्याच्या पाण्याची सुविधा.
मोफत प्रथमोपचार कीट बॉक्स सुविधा.
मोफत शौचालय सुविधा.
आग विझवण्यासाठी लागणारी उपकरणे.
पेट्रोल आणि डिझेलची गुणवत्ता तपासण्याचा अधिकार.
इंधनाच्या किंमती आणि कामाचे तास प्रदर्शित करणे.

### काय हवे पंपांवर?

पेट्रोलियम मंत्रालयाने मार्केट डिसिप्लिन गाईड लाइन दिल्या आहेत. प्राथमिक सुविधांसह अग्निशमन यंत्र, वाळूने भरलेल्या बादल्या, सेफ्टी कीट, फस्टेड बॉक्स, फोम टाइप सिलिंडर, ड्राय केमिकल पावडर, नो मोबाइल, नो स्मोकिंग बोर्ड असावे. परिसर कचऱ्यापासून मुक्त असावा.




### कारवाईची गरज

पेट्रोलियम विभागाच्या मार्गदर्शिकेत पेट्रोल पंप मालकाने नियमांचे पालन तंतोतंत करण्याच्या सूचना आहेत. पंपावर कारवाई करीता पुरवठा विभाग, वैधमापन शास्त्र विभाग, तसेच पेट्रोलियम कंपन्यांची पाहणीकरीता विशेष नियुक्ती करण्यात आलेली असते. असे असले तरी विपणन शिस्त मार्गदर्शिकेचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे दिसून येते. एक्सप्लेसिव ॲक्टनुसार ग्राहकांना प्लॅस्टिक बाटली, अन्य भांड्यांमध्ये पेट्रोल देता येत नसल्याचा नियम आहे. याचे कुठे पालन होत नाही.

### कारवाईची तरतूद

प्राथमिक सुविधांमध्ये पिण्याचे पाणी, कुलिंग वॉटर, स्वच्छता, प्रसाधनगृहाचा समावेश आहे. सेवासुविधांअभावी पहिल्या पाहणीत १० हजार रुपये, दुस-या फेरीत २५ हजार तर तिस-या फेरीमध्ये एक लाख रुपये दंड तसेच ४५ दिवसात परवाना निलंबित करण्याची कायद्यात तरतूद आहे. ग्राहकांसोबत असभ्य, गैरवर्तणुकीबद्दल देखील हजार रुपयांचा दंड आहे.

### कर्मचाऱ्यांचे मोबाईल

पेट्रोल अत्यंत ज्वलनशील पदार्थ आहे. मोबाईलमधून खतरनाक असे रेडिएशन निघतात. या रेडिएशनच्या संपर्कामुळे स्फोट होण्याचा धोका अधिक असतो. यामुळे पंपांवर देखील तशा आशयाचे फलक लावलेले दिसून येतात. शहरातील अनेक पंपांवर असे सुचना फलक दिसून येत नसून काही ठिकाणी तर चक्क पेट्रोल टाकणारे कर्मचारीच फोनवर संभाषण करतांना दिसून येतात हे नागरिकांच्या हिताचे नक्कीच नाही.

युवा आदर्श

### कुष्मांडी देवता...

ब्रह्मांड आई निर्मिले
कोव्हळ्यांतून करे
कुष्मांडाई भगवती
मनात सुखस्थ वसे
स्मितातून विश्वजन्मे
लाघवी स्नेहाळ हसे
आयुधे खलनिग्रणार्थ
राक्षसा वधले साहसे
अष्ट भुजा शस्त्रसज्ज
महाउग्र सिंहावर बसे
वर्चस्व त्रिजगतावरती
तरी अहंकार तुज नसे
सन्मार्ग दावी भक्तास
कोमलपाऊलाचे ठसे
अभय मुद्रा आकर्षक
मूर्ती मना मनात ठसे
सौर उर्जा स्त्रोत निर्मी
अनाहत चक्री निवासे
कठोरता राक्षसा प्रति
द्रवली मात्र भक्ती रसे
जगत्जननी काय देऊ
त्रिखंड अखंड तवअसे
नैवेद्यांस ठेवे भोपळा
पार्वती पावती नवसे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# खोडसाळपणाने लावली आग!

## सोयाबीन जळून तीन लाखाचे नुकसान; सोमनाथ जळगाव येथील घटना

**जालना । प्रतिनिधी** - जालना तालुक्यातील सोमनाथ जळगाव येथे कोंडीराम गंगाधर निकम यांनी काढणी केलेल्या सोयाबीनच्या गंजीला कुणीतरी खोडसाळपणाने आग लावून सुमारे अडीच ते तीन लाख रुपयाचे नुकसान केल्याची घटना आज शनिवार दि. ५ ऑक्टोबर रोजी उघडकीस आली असून, याप्रकरणी मौजपुरी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याविषयी पोलीस सूत्रांनी दिलेली अधिक माहिती अशी की, सोमनाथ जळगाव येथील कोंडीराम गंगाधर निकम यांनी श्री विठ्ठल संस्थान जळगांव यांचा गट क्रं. ११८ मधील १२ हेक्टर शेत जमीनपैकी सात एक्कर शेती माझ्याकडे मागील सात वर्षापासुन सुमारे सहा हजार रुपयेप्रमाणे ठोक्याने घेतलेली आहे, यावर्षी त्या शेतामध्ये सोयाबीन पिकाची पेरणी केली होती व दि. ४ ऑक्टोबर रोजी सायंकाळपर्यंत पुर्ण पाच एक्कर सोयाबीनची काढणी केली व गंजी लावुन ताडपत्रीने झाकून ठेवली होती. आज शनिवारी सकाळी ६ वाजता ते आणि त्यांच्या घरातील सदस्य शेतातमध्ये थोडी राहीलेली सोयाबीन काढणी करण्यासाठी गेले असता, झाकुन ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजीला आग लागलेली दिसली. सर्व सोयाबीन जळून राख झाल्याचे बघून त्यांना धक्काच बसला. शेताशेजारी असणारे तुकाराम आप्पासाहेब निकम यांना व इतर गावातील लोकांना विचारपुस केली असता त्याबाबत कोनाला काहीएक माहीती नसल्याचे त्यांनी सांगीतले. त्यामुळे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने खोडसाळपणाने सोयाबीनच्या गंजीला आग लावून चाळीस ते पन्नास क्वींटल सोयाबीन सोयाबीनचे म्हणजेच अडीच ते तीन लाखाचे नुकसान केल्याची तक्रार कोंडीराम निकम यांनी मौजपुरी पोलीस ठाण्यात दिल्यावरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध बालवी कलम ३२६ (एफ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल संजय राऊत हे करत आहेत.



# देशविरोधी कृत्यात सहभागी असल्याच्या संशयावरुन तरुण ताब्यात

## एनआयए, एटीएसची जालन्यात संयुक्त कारवाई




**जालना । प्रतिनिधी** - देश विरोधी कृत्यात सहभागी असल्याच्या संशयावरून जालना शहरात एनआयए व एटीएसच्या पथकाने संयुक्त कारवाई करत एका तरुणास ताब्यात घेतले आहे. अत्यंत गुप्त पद्धतीने शिताफीने ही कारवाई पथकाने केली आहे. एनआयए व एटीएसच्या पथकाने राज्यातील छत्रपती संभाजीनगर व मालेगाव या ठिकाणांहूनही तरुणांना ताब्यात घेतल्यांची माहिती असून देश विघातक कृत्यात सहभागी असल्याचा व जम्मू काश्मिरमधील काही संघटनांचा यात समावेश असल्याची प्राथमिक माहिती आहे.

जालना शहरातील चमडा बाजार जवळील भागात ही कारवाई करण्यात आली असून येथील शनिवार (दि ५) पहाटे ही कारवाई करण्यात आली.

प्राथमिक माहितीनूसार जम्मू आणि काश्मिरमधील काही दहशतवादी संघटनांशी या तरुणांचा संबंध असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच आंध्रप्रदेशातील पोलीस अधिकाऱ्यांना लक्ष करण्याच्या उद्देशाने माओवाद्यांना शस्त्रे आणि स्फोटके पुरवल्याचा तपास एनआयए व एटीएसच्या पथकाकडुन सध्या सुरु आहे. त्याच अनुषंगाने राज्यात जालनासह छत्रपती संभाजीनगर व मालेगाव येथून तरुणांना ताब्यात घेण्यात आले आहे. जालना येथील कारवाईत एनआयएचे अधिकारी, पुणे तसेच छत्रपती संभाजीनगर येथील एटीएस व एनआयएचे अधिकारी, दोन पोलीस अधिक्षक, दोन विभागीय पोलीस अधिकारी, जालना स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांचा समावेश होता.

# हरियाणा व जम्मू काश्मिरमध्ये भाजपाला धक्का; एक्झिट पोलचा अंदाज

**नवी दिल्ली** - हरियाणा राज्यात आज (५ ऑक्टोबर) विधानसभेच्या ९० जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान पार पडलं. ८ ऑक्टोबर रोजी विधानसभेचा निकाल समोर येणार आहे. मात्र, त्याआधी आज एक्झिट पोल समोर आले आहेत. भाजपा आणि काँग्रेसमध्ये या निवडणुकीत जोरदार रस्सीखेच पाहायला मिळाली होती, तर भाजपामधील अनेक नेत्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे या निवडणुकीकडे देशाचे लक्ष लागले होते. आता या निवडणुकीचे एक्झिट पोल समोर आले आहेत. २०१४ आणि २०१९ साली काँग्रेस सत्तेपासून दूर राहिली होती. मात्र, यावेळी हरियाणात काँग्रेसला एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार जास्त जागा मिळत असल्याचे दिसून येत आहे.
पीमार्कच्या एक्झिट पोलनुसार, हरियाणात काँग्रेसला ५१ ते ६१ जागा आणि भारतीय जनता पक्षाला २७ ते ३५ जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. तसेच पीपल्स पल्समध्ये काँग्रेसला ४९ ते ६१ जागांवर तर भाजपा २० ते ३२ जागांवर आघाडीवर दाखवलं आहे. तसेच एनडीटीव्हीच्या पोलनुसार काँग्रेसला ५५ आणि भाजपाला २५ जागा मिळू शकतात. तसेच इंडिया टीव्हीच्या पोलनुसार काँग्रेसला ४४ ते ५४ जागा आणि भाजपाला १९ ते २९ जागा मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.
जम्मू-काश्मीरमध्येही एक्झिट पोलनुसार भाजपाला धक्का बसण्याची शक्यता आहे.
एक्झिटपोलनुसा जम्मू कश्मिरमध्ये इंडिया टुडे-सी व्होटर्सच्या सर्वेनुसार काँग्रेस आणि एन.सी. आघाडीला ४० ते ४८ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर भाजपाला २७ ते ३२ जागा मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय पीडीपीला ६ ते १२, तर अपक्षांना ६ ते ११ जागा **पान २ वर**

# संपादकीय

## अभिजात मराठी...

संपूर्ण महाराष्ट्राला व जगभरात पसरलेल्या मराठी जणांना अभिमान वाटावा अशी बातमी घटस्थापनेच्या दिवशी आली आणि महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांचा ऊर अभिमानाने भरून आला. ती बातमी होती मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हे महाराष्ट्रातील तेरा कोटी जनतेचे स्वप्न होते. हे स्वप्न साकार होण्यासाठी कैक दशकांची वाट पाहावी लागली मात्र उशिरा का होईना हे स्वप्न साकार झाले यासाठी केंद्र सरकारचे मनापासून आभार मानावे लागेल त्यासोबतच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी संघर्ष करणाऱ्या हजारो ज्ञात - अज्ञात व्यक्तींनाही सलाम करावा लागेल. केंद्र सरकारने मराठीसह पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांना देखील अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. याआधी संस्कृत, तमिळ, तेलगू, कन्नड, उडिया, मल्ल्याळम या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठीच्या श्रेष्ठत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. अर्थात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याचा प्रवास सोपा नव्हता. एक हजार वर्ष जुनी व पाच हजार बोलीभाषेपासून तयार झालेली अमृतातही पैज जिंकणारी मराठी भाषा अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष पूर्ण करत असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळत नव्हता. मराठी भाषा ही मराठी संस्कृतीचा अस्सल आधार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शासकीय पातळीवर अनेकदा प्रयत्न झाले आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली होती, त्यासाठी आवश्यक असणारे सर्व पुरावे राज्य सरकारने केंद्र सरकारकडे सोपवून नऊ वर्ष झाली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली १० जानेवारी २०१२ रोजी अभिजात मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आली होती. मराठी भाषेचे संशोधन करून व सूक्ष्म अभ्यास करून पुरावे गोळा करण्याचे काम या समितीकडे सोपवण्यात आले होते. प्रा रंगनाथ पठारे यांच्यासमवेत प्रा हरी नरके आणि व अन्य काही सदस्य या समितीत होते. या समितीने अतिशय सूक्ष्म अभ्यास करून मराठी भाषा अभिजात भाषेसाठी कशी पात्र आहे याचे सर्व पुरावे गोळा करून शासनाकडे सोपवले होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास विरोध करणारी याचिकाही उच्च न्यायालयाने फेटाळली, तरीही मराठी भाषा अभिजात दर्जापासून वंचित होती. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर मराठा भाषेच्या संवर्धनासाठी केंद्राकडून जास्तीचा निधी मिळेल त्यामुळे मराठी भाषेची उंची आणखी वाढेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेची प्रतिष्ठा आणखी वाढेल. आता मराठी भाषेच्या श्रेष्ठत्वावर राज्यमान्यतेची मोहर उमटली आहे. मुख्य म्हणजे आता मराठी भाषेच्या विकास कार्याला अधिक चालना मिळणार आहे. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांना सशक्त करण्यासाठी केंद्र सरकारकडून अधिकचा निधी मिळणार आहे त्यामुळे प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे सुलभ होणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने दरवर्षी मराठी भाषेतील दोन विद्वानांना राष्ट्रीय पुरस्कार मिळतील. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे याचा महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांना अभिमान आहे. म्हणूनच अभिमानाने म्हणावेसे वाटते. लाभले भाग्य आम्हास...

बोलतो मराठी...

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# संस्कारक्षम पिढी घडवण्याचं काम हे मातृशक्ती करते - ह. भ. प.नारायण पिंपळे महाराज

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** मातृशक्ती ही संस्काराचा पाया आहे . जीवनामध्ये पहिले गुरू, ईश्वरानंतर कोणी असेल तर ते म्हणजे आई-वडील आहे .त्यामध्ये सगळ्यात मोठं काम जर कोणाचा असेल तर ते आईच आहे. आणि म्हणून संस्कारक्षम पिढी घडवण्याचं काम हे मातृशक्ती करत असते. असे प्रतिपादन ह.भ.प.नारायण महाराज पिंपळे (गुरुजी) यांनी श्रीक्षेत्र डावरगाव देवी ता. जाफराबाद या ठिकाणी सुरू असलेला नवरात्र उत्सव जगतमाता जगदंबा मातेच्या मंदिर परिसरामध्ये अखंड हरिनाम सप्ताह मध्ये शुक्रवारी ता.४ झालेल्या कीर्तन रुपी सेवेतून केले.

डावरगाव देवी येथील जगत माता जगदंबा माता जागृत देवस्थान भव्य दिव्य मंदिराच्या परिसरामध्ये नित्यनेमाप्रमाणे नवरात्र उत्सवामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते .याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन सुंदर असे वातावरणामध्ये श्रीक्षेत्र डावरगाव देवी या ठिकाणी सुरू आहे. त्यामध्ये सप्ताहातील दुसऱ्या दिवशीची कीर्तन रुपी सेवा ह.भ. प. नारायण महाराज गुरुजी यांच्याकडे होती. महाराजांनी जगद्गुरु तुकोबारायांचा !!संत समागम एखादीये परी व्हावे त्यांचे द्वारी श्वानयाती तेथे रामनाम होईल श्रवण !घडेल भोजन उचिष्टांचे!! या अभंगावर चिंतन केले!!

आज विज्ञान युगामध्ये खरी गरज जर कशाची असेल तर संगतीची आहे. संस्काराची आहे. आज जर सुसंस्कार पिढी जर घडली तरच उद्याच भविष्य चांगले असणार आहे. आणि हे संस्कार घडण्याचे पहिले केंद्र जर कोणते असेल तर ते आई वडील आहे. आजच्या काळामध्ये आई-वडिलांना संस्कार क्षम मुले बनवणे हे काळाची गरज आहे. आणि म्हणून सगळ्यात जास्त जर मुलांसोबत जर कोणी राहत असेल तर ती आई . आणि म्हणून मातृशक्ती आई तुळजाभवानी माता .आई जगदंबा माता जर कोण असेल तर आजची मातृशक्ती आहे. आणि मातृशक्तीच आपल्या मुलांना चांगले उत्तम संस्कार देऊ शकते. जेणेकरून तो भविष्यामध्ये चांगला माणूस होईल आज विज्ञान युगामध्ये अधिक काही संपत्ती कमावण्यापेक्षा उत्कृष्ट सुंदर चांगलं व्यक्तिमत्त्व कमवणे गरजेचे आहे .आणि म्हणून आज संस्काराची गरज आहे . जगद्गुरु तुकोबाराय सांगतात !!तुका म्हणे सर्व सुख



त्या संगती!! घडेल पंगती संतांचीये !!

जगामधले सर्व सुख जे काही असेल ते संतांच्या, चांगल्या व्यक्तीच्या ,श्री गुरुच्या संगतीत आहे .आणि म्हणून आपल्याला चांगली संगत असली पाहिजे. संगत जर चांगली असेल तर पंगतही चांगली मिळाल्याशिवाय राहणार नाही. असं संत वचन आहे त्या संत वचनाचा एक गाथा मधील २२१ क्रमांकाचा अभंग घेऊन सुंदर असं निरूपण या ठिकाणी महाराजांनी मांडलेले आहे. या कीर्तनामध्ये गायनाची साथ करण्याकरता ह.भ.प.कोमल महाराज जोशी ह.भ.प.कृष्णा महाराज, ह.भ.प.अनिल महाराज देव्हडे(गायनसम्राट) ह.भ.प.निवृत्ती महाराज कोरडे(कीर्तनकार)त्याचबरोबर मृदंगाची साथ देण्याकरता ह.भ.प.प्रमोद सहाने महाराज, ह.भ.प.विठ्ठल महाराज, हे होते तर टाळकरी विणेकरी त्या टाळकरी मध्ये ह. भ .प. बबन महाराज चव्हाण, ह.भ.प. संतोष महाराज चव्हाण, ह.भ.प.सुखदेव महाराज पिंपळे ह.भ.प. राजु महाराज गिरी, ह.भ.प.भगवान महाराज चव्हाण, ह.भ. प. विनायक महाराज चव्हाण ह.भ. प.बाला साहेब पिंपळे,ह.भ.प. सुभाष महाराज पिंपळे, ह.भ.प.एकनाथ महाराज कोरडे.सारंगधर महाराज गिरी,आदींनी कीर्तनामध्ये साथ दिली . कीर्तनासाठी दगडुबा देठे, त्याचबरोबर सखाराम नवले, शंकर लहाने , प्राचार्य विलास नवले , लक्ष्मण देठे, दिनकर नवले, दत्तु देठे, गजानन नवले व सर्व गावकरी उपस्थीत होते.

# राष्ट्रीय कृषी विकास योजना : प्रति थेंब अधिक पीक सूक्ष्म सिंचन योजना

राज्याकडे उपलब्ध पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळवण्यासाठी व सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारी प्रति थेंब अधिक पीक सूक्ष्म सिंचन योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून योजनेंतर्गत केंद्र व राज्य हिश्याच्या अर्थसहाय्याचे प्रमाण ६०:४० आहे. ही योजना राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येते. सूक्ष्म सिंचन योजनेत राज्य देशात अग्रेसर असून ३१.९६ लाख हेक्टर क्षेत्रास सूक्ष्म सिंचन योजनेतून लाभ देण्यात आला आहे. तसेच या योजनेकरिता सन २०२४-२५ मधील प्राप्त पहिल्या हप्त्याचा रु. ११३.९० कोटी निधी वितरित केला आहे.

या योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के तर इतर शेतक-यांना (५ हे. क्षेत्राच्या मर्यादेत) ४५टक्के अनुदान देण्यात येते. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पीक या योजनेंतर्गत अनुज्ञेय अनुदानाशिवाय मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेमधून व अटल भूजल योजनेमधून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या २५ टक्के पूरक अनुदानासह एकूण ८० टक्के आणि इतर शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या ३० टक्के पूरक अनुदानासह एकूण ७५ टक्के अनुदान देण्यात येते. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पीक या योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये १ लाख १६ हजार ७०० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असून त्याद्वारे ९३ हजार ३०७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात आले आहे.

सन २०२४-२५ या वर्षात राष्ट्रीय कृषि विकास योजना - प्रति थेंब अधिक पीक योजनेकरिता रु. ६६७.५० कोटी रकमेचा कार्यक्रम मंजूर केला आहे.राष्ट्रीय कृषि विकास योजना - प्रति थेंब अधिक पीक योजनेकरिता सन २०२४-२५ मधील प्राप्त पहिल्या हप्त्याचा सर्व साधारण प्रवर्ग ८९.५० कोटी रुपये, अनुसूचित जमाती प्रवर्गाचा १०.४० कोटी रुपये, अनुसूचित जाती प्रवर्गाचा १४ कोटी रुपये असा एकूण ११३.९० कोटी रुपये निधी जिल्हा स्तरावर वितरीत केला आहे.

**दत्तात्रय कोकरे**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई-३२.**

# माझी 'अभिजात' मराठी

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा अधिकृतपणे प्राप्त झाला याचा सर्वच मराठी भाषिकांना अभिमान आहे. याचा संदर्भ थेट बीड सोबत असल्याचा विशेष आनंद समस्त बीडवासियांना आहे. याच बीडच्या भूमीत आद्यकवी मुकुंदराज यांनी शके ११९० मध्ये पहिला मराठी ग्रंथ विवेकसिंधू लिहिला.

मराठी भाषा ही मूळची आर्यांची भाषा मानली जाते. भाषेचा उगम उत्तरेकडे झाला असला तरी ही भाषा सातपुडा पर्वतरांगांपासून खाली कावेरी नदीच्या खोऱ्यापर्यंत विस्तारली व स्थिरावली. भाषा दर दहा कोसांवर बदलते आणि त्यानुसार मराठी संभाषणाच्या विविध शैली विकसित होत गेल्या.

मराठी भाषा बोलणारे राज्य म्हणून १९६० साली भाषावार प्रांतरचनेत महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. त्यानंतर आजपर्यंत मराठी भाषेचा सतत विकास आपण बघतो. त्यापूर्वी असणाऱ्या काळातील मराठी भाषेचा प्रवास देखील तितकाच महत्त्वाचा आहे.

इसवी सन ५०० ते ७०० या काळात पूर्ववैदिक, वैदिक नंतर संस्कृत, पाली प्राकृत यात विविध उत्क्रांत होत मराठी भाषेचा उगम झालेला मानला जातो. 'श्री चामुन्डाराये करविले' असे शिलालेखावरील मराठी भाषेत लिखित पहिले वाक्य श्रावणबेळगोळ येथे असल्याचा दाखला उपलब्ध आहे.

संत वाङ्मयातून मराठीचा लिखित प्रसार होत गेला. महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर यांच्या रचनांमधून लिखित तसेच बोलीभाषेतील मराठी प्रगत आणि प्रगल्भ होत होती. मराठी भाषेबाबत संत ज्ञानेश्वर यांनी केलेले वर्णन सार्थ आहे. 'परी अमृतातेही पैजा जिंके, ऐसी अक्षरेचि रसिके मेळविण'.

भाषेत असणारे सौंदर्य आणि ते अधिक खुलविणारे अलंकार सर्वात महत्त्वाचे म्हणजे नव्याचाही स्विकार करणारी भाषा म्हणून मराठीला पाहिले जाते. सर्व भाषांमधील शब्दांना जोडत आल्याने मराठी अधिकच समृद्ध झालेली आहे.

इतक्या वर्षांच्या प्रवासात विविध शासकांचा अंमल या प्रांतावर राहिला त्यामुळे मराठी भाषेत शब्दसंग्रह सातत्याने वाढत राहिला. अरबी, फारसी, उर्दू, इंग्रजी अशा अनेक भाषेतील शब्द मराठीत कायमचे आले आणि आज ते मराठी भाषेचा भाग बनलेले आपणास दिसतात. आज संगणक युगात मराठी इंटरनेटच्या प्रमुख भाषांपैकी एक आहे आणि मराठी भाषक आवर्जून मराठीचा वापर करतात, ही अतिशय अभिमानाची बाब आहे.

साधारण २०१० च्या प्रारंभी फेसबुकच्या सारख्या माध्यमातून मी मराठी वापरायला सुरुवात केली. त्यावेळी इंग्रजी शब्दावलीत मराठी संदेश लिहिणारे अधिक होते व मराठीचा असा मराठीचा वर्ग मी सुरू केल्यावर अनेक जण मराठी कडे आकर्षित झाले. संगणक क्रांतीत 'युनिकोड' आल्याने या आभासी जगात मराठीचा झपाट्याने विस्तार झाला. मी स्वतः या माध्यमाला दिलेले शब्द आज दरमहा कोट्यावधी वेळा वापरल्याचे संदेश येतात. त्यावेळी मराठी भाषक म्हणून याचा मलाही अभिमान वाटतो.

मराठी भाषेचा प्रवास केवळ पुस्तकातूनच नव्हे तर प्रत्यक्षात अनुभवण्याची संधी मला शासकीय नोकरीच्या निमित्ताने मिळाली. २२ जिल्ह्यांमधून फिरताना त्या त्या ठिकाणचा मराठीचा लहेजा आणि गोडवा जाणवतो. रत्नागिरी ते गडचिरोली असा कार्यक्षेत्राचा प्रवास राहिल्याने मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात जशी भाषा वेगवेगळी बोलली जाते तशीच ती वऱ्हाडात, झाडीपट्टीत, पश्चिम महाराष्ट्रात तसेच कोकणात, खानदेशात आणि पुण्या - मुंबईतही वेगळी राहते.

महानगरीय प्रभाव असणारी मुंबईची मराठी खूपच वेगळी आहे. विद्येचं माहेरघर पुण्याची मराठी तितकीच सरळ आहे. आत्मियता जपणारी आणि विशिष्ट शब्दांना खेळवणारी वर्धा - नागपूरची मराठी वेगळी आहे. सिमावर्ती जिल्ह्यांमध्ये सिमेलगत असणाऱ्या नजिकच्या राज्यातील भाषेच्या प्रभावाखाली असणारी मराठी आणखीनच वेगळी वाटते.

कोकणातली मराठी, तळकोकणची मालवणी आणि गडचिरोलीतील मराठी एकदम भिन्न आहेत. जिल्हा बदल झाल्यास जाणवतं की पदार्थ, वस्तू आणि भांड्यांची नावे एकाच भाषेतली असली तरी ती जुळत नाही.

पुण्यात अमृततुल्य अर्थात चहा करतात तर मुंबईत चहा बनवतात. विदर्भात मात्र चहा मांडतात ही भाषिक गंमतच आहे. साधारणपणे रस्त्यावर डावीकडे किंवा उजवीकडे वळतात मात्र खानदेशात डावीकडे फाकाचं असतं.

मराठवाडी माणसं अंगावर कपडे घालतात मात्र वैदर्भिय मराठीत कपडे लावतात..खूप वाटत असला तरी तोच मराठीचा वेगळेपणा आहे. अगदी भाषा तीच फरक.. काई त नी. (वर्धा) अर्थात काही तर नाही.!

**- प्रशांत विजया अनंत दैठणकर**
**जिल्हा माहिती अधिकारी, बीड**

## पान १ वरुन

### हरियाणा व ...

मिळण्याची शक्यता आहे.

न्यूज २४ चाणाक्यच्या एक्झिट पोलनुसार, भाजपा २३ ते २७ जागा, काँग्रेस-एन.सी. ४६ ते ५०, पीडीपी ७ ते ११ तसेच इतर ४ ते ६ जागा मिळण्याची शक्यता आहे.

टाईम्स नाऊच्या एक्झिट पोलनुसार, भाजपाला २८ ते ३० जागा, काँग्रेस-एन.सी.आघाडीला ३१ तो ३६ जागा, पीडीपीला जागा ५ ते ७, तर अपक्षांना ८ ते १६ जागा मिळण्याची शक्यता आहे.

रिपब्लिक टीव्ही-पी मार्कच्या एक्झिट पोलनुसार, भाजपाला २८ ते ३० जागा, काँग्रेस-एन.सी. आघाडीला ३१ ते ३६ जागा, पीडीपीला ५ ते ७ जागा, तर अपक्षांना ८ ते १६ जागा मिळण्याची शक्यता आहे.

निवडणूक निकालाचे अंदाज व्यक्त करण्याची अनेक माध्यमं असून त्यातील सर्वात विश्वासार्ह माध्यम म्हणून एक्झिट पोलकडे पाहिलं जातं. कारण एक्झिट पोल तंतोतंत नसला तरी निकालाच्या जवळपास जाणारा असतो. एक्झिट पोल हा निवडणुकीचा सर्व्हे असतो. हा सर्व्हे मतदानाच्या काळात केला जातो. वेगवेगळ्या संस्था हा सर्व्हे करत असतात. त्या सर्व्हेच्या आधारे कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील? याचा अंदाज बांधला जातो. याबरोबरच कोणत्या पक्षाचे किती उमदेवार जिंकणार याचा अंदाज काढला जातो.

झाडे लावा झाडे जगवा

# जैन विद्यालयात येथे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्रीजी यांची जयंती उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** येथील श्री म स्था जैन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी जी व लालबहादुर शास्त्रीजी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री . एस एम . वानगोता उपमुख्याध्यपक श्रीमती. श्रीपत पर्यवेक्षिका श्रीमती सोमानी,पर्यवेक्षक,, श्री डी.एस.शिंदे, शिक्षक् शिक्षिका यांनी महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण केले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री वानगोता एस एम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वच्छतेचे महत्व या विषयी माहिती दिली.सत्य व अहिंसेच्या मार्गाने जीवनात वाटचाल करावी असे सांगितले. लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याचीही माहिती विद्यार्थ्यांना दिली व त्यांच्या विषयी मूर्ती लहान पण कीर्ती महान आसें सांगितले. विद्यालयातील शिक्षिका श्रीमती.सारिका देशपांडे यांनी महात्मा गांधीजी व लालबहादुर शास्त्रीजी व यांनी केलेल्या महान कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली यप्रसंगी विद्यार्थ्यांनी जय जवान जाय किसान नारा दिला. विद्यालयातील भविद्यार्थीभुतेकर व विद्यार्थिनी अक्षरा शिंदे व आकांशा शिवतारे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विषयीची माहिती विद्यार्थ्यांना दिली.याप्रसंगी विद्यालयातिल एनसीसी शिक्षिका श्रीमती इंदानी यानी विद्यार्थ्याकडून



शालेय परिसराची स्वच्छता करून घेतली ..कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन यश देशमुख या विद्यार्थ्याने केले.

# भाजपाच्या नेत्यांना तुरूगांत टाकण्याचा ठाकरेंचा डाव आम्ही हाणून पाडला - एकनाथ शिंदे

**मुंबई -** भाजपला घाबरवून २० ते २५ आमदार फोडायचे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री गिरीश महाजन यांच्यासह भाजपच्या पाच नेत्यांना तुरुंगात टाकून महाविकास आघाडी मजबूत करण्याचा उद्धव ठाकरेंचा डाव होता. मात्र आम्ही त्यांचा हा डाव हाणून पाडला, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी येथे केला. ईशान्य मुंबई मतदारसंघात भांडुप येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता मेळाव्यात शिंदे बोलत होते. या वेळी महायुतीचे उमेदवार मिहिर कोटेचा यांच्यासह आमदार आणि पदाधिकारी उपस्थित होते. महाविकास आघाडी सरकारच्या अडीच वर्षांच्या काळात अनेक विकास प्रकल्पांमध्ये अडथळे निर्माण करून हे प्रकल्प रोखण्यात आले. मात्र आपल्या सरकारने या सर्व प्रकल्पांतील अडथळे दूर केले. आरेमधील मेट्रो कारशेडच्या कामावरील बंदी हटविली. आरेमध्ये कारशेड केले नसते तर आपण दहा वर्षे मागे गेलो असतो. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी १० हजार कोटी अधिक लागले असते. बालहट्ट आणि अहंकार यामुळे यापूर्वीच्या सरकारने मेट्रो कारशेडबाबत घेतलेल्या निर्णयाने राज्याचे नुकसान झाल्याचा आरोपही मुख्यमंत्र्यांनी केला. कोणत्या भागातून किती मताधिक्य मिळते त्यावर महापालिकेसाठी उमेदवार ठरवले जातील. त्यामुळे सर्व मतभेद बाजूला ठेवावेत आणि सर्वांनी जास्तीत जास्त जागा जिंकण्यासाठी महायुतीसाठी काम केले पाहिजे अशा सूचनाही शिंदे यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या.

# यती नरसिंहानंद सरस्वती विरुद्ध परतूर मुस्लिम समाजाच्या वतीने निवेदन

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर येथील कायमस्वरूपी रहिवासी मुस्लिम समाज असून आम्हाला व्हाट्सप व विविध सामाजिक माध्यमातून व्हिडिओ प्राप्त झाले आहेत.दि.२९ सप्टेंबर २०२४ रोजी लोहिया नगर गाजियाबाद येथील हिंदी भावनात एका सेवाभावी संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात डासना मंदिराचे महंत यती नरसिंहानंद सरस्वती उपस्थित होते. या कार्यक्रमात महंत येती यांनी अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केले त्यांनी म्हटले की आता तर असे असे अपराधी जन्माला आले आहेत की त्यांच्यासमोर रावणाची पण अस्तित्व नाही. जर जाळायचं असेल तर आज सर्व हिंदूंना मंचावरून आव्हान करतो जर जाळायचं असेल तर प्रत्येक दसऱ्याच्या दिवशी मोहम्मद ला जाळा. मग पहा आपल्या लाखो करोडो बहिणी लेकीचा बलात्कार ज्या व्यक्तीच्या कारणाने तो आहे अरब चा लुटेरा मोहम्मद सर्व देशात खून खराबा होत आहे तो आहे दरिंदा मोहम्मद जर जाळायचे असेल तर मोहम्मद चे पुतळे जाळायला सुरुवात करा असे केल्यास मोहम्मदच्या बाऱ्यात बोलले जाईल. या व्यक्तिव्यामुळे मुस्लिम समाजात प्रचंड रोष निर्माण झाला आहे कारण गेल्या काही काळात काही समाजविरोधी घटक वारंवार आमच्या प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा अपमान करत आहेत. ज्यामुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या जात आहेत. इस्लाम धर्मात प्रेषित मोहम्मद यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ते सर्व मानवजातीसाठ शांती करुणा आणि सत्याचा संदेश देणारे आहेत. त्यांच्या जीवनाचे आदर्श जगभरातील कोट्यावधी लोकांसाठी प्रेरणादायी आहे येती नरसिंहानंद सरस्वती यांनी जाणीवपूर्वक आमच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत आणि समाजात द्वेषनिर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे हिंदू व मुस्लिम समाजामध्ये तणाव वाढविण्याचे षडयंत्र रचले आहे. यावेळी मुक्ती कदीर शेख. मुक्ती जहीर फारुकी.ड.महेंद्र बेडेकर.ड. इंतेजार अन्सारी. रहमदिन कुरेशी. नसीर चाऊस मोईन कुरेशी. शेख अहमद. शेख अमजद. अजित भाई सौदागर.यामुळे यती महंत वर कारवाई करण्यात यावी यासाठी परतूर येथील पोलीस स्टेशन येथे निवेदन देण्यात आले.यांच्या निवेदनावर सह्या आहेत.



राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाची बैठक संपन्न

# सफाई कर्मचाऱ्यांचे हिपॅटायटीस बी लसीकरण पूर्ण करावे - सदस्य डॉ. वावा

**जालना । प्रतिनिधी -** सफाई कर्मचाऱ्यांना हिपॅटायटीस बी विषाणूजन्य संसर्ग होवू नये याची दक्षता घेणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्ह्यात सफाई कर्मचाऱ्यांना नि:शुल्क लसीकरण करण्याची व्यवस्था करण्यात यावी. आगामी तीन महिन्यात जालना जिल्ह्यात शिबिरे घेवून सर्व सफाई कर्मचाऱ्यांचे हिपॅटायटीस बी लसीकरण पूर्ण करावे, अशी सूचना राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाची बैठक डॉ.वावा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस सल्लागार श्री.जिजेंद्र, समन्वयक श्री.चरण, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, उपायुक्त नंदा गायकवाड यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ.वावा म्हणाले की, सफाई कामगारांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याचे निर्देशही डॉ. वावा यांनी दिले. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची सफाई कर्मचाऱ्यांना मदत मिळण्यासाठी शासन निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी. सफाई कामगारांना कठीण समस्यांना सामोरे जावे लागणार नाही. तसेच हक्कापासून सफाई कामगार वंचित राहणार नाही. याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. सफाई कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर केवळ अर्थसहाय्य न देता त्यासोबत त्यांच्या पाल्यांना माध्यमिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, वृध्द आई-वडिलांना पेंशन तसेच त्यांना घर नसल्यास घरबांधणीसाठी सुध्दा अर्थसहाय्य करणे गरजेचे असल्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार कार्यवाही करण्यात यावी.

अस्थायी व स्थाई सर्व सफाई कर्मचाऱ्यांना गणवेश, गमबुट, हँडग्लोज, रेनकोट, थंडीचे स्वेटर आदी साहित्य वेळोवेळी पुरवठा करण्यात यावा. त्यांच्या ओळखपत्रावर मोबाईल क्रमांक, रक्तगट, ईपीएफ, ईएसआयसी नंबरही अनिवार्य करण्यात यावा. आणि सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर करण्यात यावे. अशी सुचनाही सल्लागार जिजेंद्र यांनी यावेळी केली. यावेळी सफाई कर्मचारी व त्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

खोतकरांचा विकास कामाचा झपाटा सुरूच...

# सामाजिक न्याय विभागाकडून पाच कोटी निधी उपलब्ध

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदारसंघासाठी सदैव तत्पर व कार्यशील असणारे शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर यांचा विकास कामाचा झपाट सुरूच असून त्यांनी पुन्हा जालना विधानसभा मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्याकडून सामाजिक न्याय विभागामार्फत मतदार संघातील ५० गावांमध्ये सभागृह बांधकामासाठी ०५ पाच कोटी रुपये निधी उपलब्ध करून घेतला आहे मा.मुख्यमंत्री महोदयांनी मतदार संघातील विविध विकास कामासाठी आपल्याला करोडो रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला असून ही कामे प्रगतीपथावर आहेत व काही पूर्ण झालेले आहेत आता पुन्हा ५० गावासाठी दलीत वस्ती मधील विकास कामासाठी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत २४ २५ या वर्षासाठी पाच कोटी रुपये निधी शासन निर्णय क्रमांक सावियो २०२४ /प्र.क्र.५५२/अजाक दि. ०४आक्टोंबर २०२४ नुसार उपलब्ध करून घेतला आहे निधी दिल्याबद्दल आपण मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस अजितदादा पवार,यांचे मनापासून आभार व्यक्त करतो व त्यांना मनापासून धन्यवाद देतो असे अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले, असूनही कामे तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेतले जातील व दर्जेदार प्रमाणे पूर्ण केले जाणार आहे असे सांगितले.



# भाजपा कार्यकर्ता महामेळावा व भाजपा सदस्यता अभियानाचा शुभारंभ

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी १०१ जालना विधानसभेचा भाजपा सदस्यता अभियान व कार्यकर्ता महा मेळावा माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये रविवार (दि ६) रोजी सकाळी १०.०० वाजता, गोकुळ लॉन्स, जिंदल मार्केट, जालना येथे आयोजित करण्यात आला आहे

या मेळाव्यास जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे व महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, भाजपा प्रदेश सदस्य रामेश्वर भांदरगे, राजेश राऊत, विजय कामड, सौ.विमलताई आगलावे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या भाजपा कार्यकर्ता महा मेळाव्यास व भाजपा सदस्यता अभियान कार्यक्रमास १०१ जालना विधानसभेतील सर्व भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व बंधु भगिनिंनी आवर्जून उपस्थितीत रहावे असे आवाहन जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांनी केले आहे.

# घर व घरातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत मशालचिन्ह पोहोचवा

जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांचे आवाहन; बदनापूर मतदार संघातील पदाधिकाऱ्यांची बैठक

**जालना । प्रतिनिधी -** आगामी निवडणुकीत उमेदवार कोणीही असो. परंतु आजच्या घडीला आपला उमेदवार केवळ मशाल आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी धनुष्यबाण विरोधकांनी चोरला. पक्षाला मशाल चिन्ह मिळाल्यानंतर हे चिन्ह सर्वच नागरिकांना माहीत नसल्यामुळे आपल्या मतावर परिणाम झाला. तर आमचे धनुष्यबाण हे चिन्ह समजून नागरिकांनी मतदान केल्याने विरोधकांना त्याचा फायदा झाला. त्यामुळे आता मशाल चिन्ह हे प्रत्येक मतदारापर्यंत जाणे आवश्यक आहे. आज रोजी आपला उमेदवार ठरलेला नाही परंतु आपले चिन्ह मशाल हे समजून प्रत्येकाने कामाला लागावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांनी केले.

बदनापूर मतदारसंघातील पदाधिकार्यांची महत्वाची बैठक शिवसेना भवन येथे शनिवारी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत विभाग प्रमुख, तालुकाप्रमुख, उपतालुकाप्रमुख यांच्यासह प्रमुख पदाधिकार्यांची उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार संतोष सांबरे, जिल्हासंघटक भानुदास घुगे, तालुकाप्रमुख जयप्रकाश चव्हाण, तालुकाप्रमुख अशोकबर्डे, कैलास चव्हाण, बाबुराव पवार यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर म्हणाले की, पुढे बोलताना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर म्हणाले की, पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे हे मागील अनेक वर्षांपासून अन्यायाच्या विरोधात संघर्ष करत आहेत. पक्षाचे नाव, पक्षाचे चिन्ह गेले तरी त्यांनी हिम्मत न हारता नव्या जोमाने पक्ष बांधणी केली पक्ष उभा केला. सोयाबीन, कपाशी यासह शेतकर्यांच्या मालाला चांगला भाव मिळावा, सामान्य नागरिकांना न्याय मिळावा त्यांचे प्रश्न सोडले जावेत यासाठी ते सातत्याने धडपडत असुन सामान्य नागरिकांसाठी सातत्याने ते लढत आहेत. येत्या निवडणूकीत महाविकास आघाडीच्या जागा निश्चित वाढणार असून सत्तांतर अटळ असल्याचे ते म्हणाले. पक्षाच्या जास्तीत जागा याव्यात यासाठी उद्धवजी ठाकरे हे सातत्याने राज्यभर फिरून लोकांशी संवाद साधत असल्याचेही जिल्हाप्रमुख अंबेकर यांनी सांगितले. आगामी नवरात्रीच्या चार दिवसात बदनापूर विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद गट निहाय मशाल यात्रेचे नियोजन करण्यात आले. सर्वांपर्यंत मशालचिन्ह पोहोचविण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी या बैठकीत केला. यावेळी माजी आमदारसंतोष सांबरे म्हणाले की, आगामी विधान सभा निवडणुकीत कोणत्याही परिस्थिती बदनापूर-अंबड विधान सभामतदार संघावर शिवसेनेंचा झेंडा फडकायचा असेल तर शिवसैनिकांनी तण,मन,धनाने काम करुन प्रत्येक घरात व माणसांपर्यंत शिवसेनेचे मशाल चिन्ह पोहोचवावे, असे आवाहन सांबरे यांनी केले.

यावेळी कुमार रूपवते,भरत सांबरे,दिनेश काकडे, श्रीराम कान्हेरे, जगन दुर्गे, रामेश्वर फंड, केशव क्षीरसागर, गजानन सानप, कल्याण टकले, मुकुंद हुसे, सिद्धेश्वर उबाळे, अर्जुन ठोंबरे, रामभाऊ मसलेकर, राजेंद्र गव्हाड, फारूक पठाण, अनिस पटेल, फैजान मिर्झा,सगीर सिद्दिकी, संजय जाधव, परमेश्वर चंद, ज्ञानेश्वर गरबडे, तपन पडघन, विकास करतारे, नितीन कोलते, निंबाजी क्षीरसागर, कैलास भुजंग, जावेद खान, शैलेश दिवटे, राहुल गिरी,सुरेश राठोड, राजू पवार, कृष्णा पवार, मिर्झा अल्ताफ बेग, मिर्झा अशपाक बेग, मिर्झा गालिब बेग, शिवाजी गव्हाड, कल्याण जाधव, संजय कोळेकर, नाना ओळेकर, बंडू फंड, हरून पटेल, अभिषेक फंड, विठ्ठल फंड, बाबासाहेब ओळेकर, कृष्णा ओळकर, धर्मा ओळेकर, सुखदेव दाभाडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थिती होते.




# पीपीटी स्पर्धेत कु.प्रिया जोशी, श्रुती ओझा, दिव्या सिसोदे, प्रतीक्षा शहाणे विजेते

**परभणी । प्रतिनिधी -** कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी येथे वाणिज्य विद्या शाखेच्या वतीने पावर पॉइंट प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत बी.कॉम,एम.कॉम च्या १४ विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ वसंतराव भोसले हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा डॉ. मल्हारीकांत सोंडगे, उपप्राचार्य डॉ संगीता आवचार,परिक्षक प्रा.पंडितराव नवघरे,प्रा.चारुशीला पाटील यांची उपस्थिती होती.

स्पर्धेचे समन्वयक डॉ पंकज अबोटी यांना प्रसंगी विभाग प्रमुख डॉ गणेश जाधव, डॉ.दिनेश धनेश्वर,प्रा.गंगाधर गव्हाणे यांचे सहकार्य लाभले.




पावर पॉइंट प्रेझेंटेशन साठी आपले कौशल्य पणाला लावत क्षमताधिष्ठीत, दर्जेदार, गुणवत्ता पूर्ण,नाविन्यपूर्ण, आशयघन,सुंदर व समर्पक अशी अभ्यासपूर्ण मांडणी विद्यार्थिनींनी केली.

या स्पर्धेत बी.कॉम द्वितीय वर्षाची प्रिया जोशी हिने ७०१रु सह प्रमाणपत्र असे प्रथम पारितोषिक पटकावले. बी.कॉम प्रथम वर्षाची श्रुती वझे हिने ५०१ रुपयांसह प्रमाणपत्र असे द्वितीय पारितोषिक पटकावले. बी.कॉम द्वितीय वर्षाच्या दिव्या सिसोदे, प्रतीक्षा शहाणे यांनी २५१ रुपये प्रमाणपत्रा सह तृतीय पारितोषिक पटकावले. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक प्रमाणपत्र देऊन विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ.पंकज अबोटी यांनी केले.

# लॉयन्स क्लबतर्फे साहित्यिक रेखा बैजल यांच्या सेवा कार्याचा गौरव



**जालना । प्रतिनिधी -** लायन्स क्लब ऑफ जालनातर्फे समाजसेविका आणि प्रसिद्ध लेखिका लॉ. रेखा बैजल यांच्या असामान्य सेवा कार्याचा सन्मान करण्यात आला.

लॉयन्स सेवा सप्ताह आणि नवरात्रोत्सवानिमित्त समाजसेवी व नारीशक्तीचा गौरव करण्यात येत आहे, त्याअंतर्गत क्लबच्या सदस्यांनी रेखा बैजल यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा गौरव केला. रेखा बैजल यांनी समाज प्रबोधनाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

त्यांनी केवळ लेखणीतून समाजाला जागृतच केले नाही, तर अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये अग्रगण्य भूमिका बजावली आहे. त्यांच्या असाधारण सेवा कार्याची आणि साहित्यिक कामगिरीची दखल घेत लायन्स क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्ढा, संगीता रुणवाल, श्रुती खिस्ते, राजेश खिस्ते, जयप्रकाश श्रीमाळी, आणि अतुल लड्ढा यांनी त्यांचा औपचारिक सत्कार केला. यावेळी शिवकुमार बैजल यांनी सर्व लायन्स सदस्यांचे स्वागत केले. हा सत्कार सोहळा क्लबसाठी एक प्रेरणादायी क्षण ठरला, ज्याने सर्वांना समाजसेवेच्या दिशेने नव्या उत्साहाने प्रेरित केले.

# मातंग समाजाची संभाजीनगर कडे पदयात्रा रवाना

**जालना । प्रतिनिधी -** अनुसूचित जाती जमातीच्या उपवर्गीकरणाच्या अमंलबजावणीसाठी मातंग समाज आक्रमक झाला असून आज दिनांक ४ शुक्रवार रोजी एक वाजेच्या सुमारास लाँग मार्च काढण्यात आला आहे.या पदयात्रेला जालना शहरातील उड्डानपुल परिसरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापासून सुरुवात करण्यात आली. अंबड चौफुली मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोरून मोतीबाग मार्गे संभाजीनगर कडे पदयात्रेने मार्गक्रमण केले आहे.

सुप्रीम कोर्टाच्या दवेंदर सिंग विरुद्ध स्टेट ऑफ पंजाब सिव्हिल केस मध्ये ७ जजेसच्या खंडपीठाने अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाची अमंलबजाणी करण्याच्या सूचना राज्याला दिली होती. मात्र अद्याप राज्य सरकारनं याबाबत कुठलेही पाऊल उचलेले नाही. त्यामुळं जालना ते संभाजीनगरपर्यंत मातंक समाज आणि ईतर अनुसूचित जातींना घेऊन पायी मोर्चा काढण्यात आला आहे. शहरातील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या मोर्चाला सुरुवात आली असून ७ तारखेला संभाजीनगरला धडकणार आहे. विभागीय आयुक्त कार्यालयावर या मोर्चाची सांगता होणार असून अनुसूचित जाती जमातीच्या उपवर्गीकरणाची तात्काळ अमंलबजावणी करावी अशी मागणी करण्यात येणार आहे. ढोलताशाच्या गजरात पदयात्रा जालना येथून संभाजीनगर कडे रवाना झाली आहे.

# खा. डॉ. श्रीकांत शिंदे जालन्यात; संवाद मेळाव्यास उपस्थित रहा

## माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे दिनांक ८ ऑक्टोबर २०२४ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून ते जिल्ह्यातील शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी ,शेतकरी सेना, व शिवसेनेच्या सर्व अंगीकृतर संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्ते गटप्रमुख प्रमुख बुथ प्रमुख यांच्याशी संवाद साधणार आहेत. त्यानिमित्ताने ८ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मामा चौक जालना येथे सकाळी १०.०० वाजता संवाद मेळाव्याचे आयोजन केलेले आहे. डॉ. खा. श्रीकांत शिंदे हे प्रथमच जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यामुळे शिवसेनेच्यावतीने त्यांचे भव्य असे स्वागत करणे आपले आद्यकर्तव्य असून त्यामुळे आपण आपल्या भागातील कार्यकर्ते, शिवसैनिक, युवा सैनिक, शेतकरी बांधव, महिला भगिनींनी या संवाद मेळाव्यास व स्वागत सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित जालना विधानसभा मतदारसंघातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत दरम्यान मार्गदर्शन करताना केले.



भाग्यनगर येथील दर्शना बंगल्यावर शनिवार (दि ५) संवाद मेळाव्याच्या पूर्वतयारी संदर्भात प्रमुख शिवसेना कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी युवासेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त, युवा सेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, शैलेश घुमारे, महिला आघाडी जिल्हा प्रमुख कालींदाताई ढगे, महिला आघाडीच्या ज्येष्ठ नेत्या सविता किवंडे, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, गणेश सुपारकर, उपशहरपमुख लक्षण अवघड, युवा सेनेचे योगेश रत्नपारखे, दीपक वैद्य, अल्पसंख्यांक सेलचे जाफरखान, शेख नजीर, तालुकाप्रमुख भगवान अंभोरे, राहुल गवारे, किशोर पांगारकर, गोपी गोगडे, संतोष जांगडे, राजू माधवाले, दिनेश भगत, निखिल पगारे, संजय डुकरे, कांता रांजणकर, मनोज लाखोले, शिवसिंग तिलवारवाले, संतोष शिकारे, दीपक राठोड, शिवाजी शेळके, संदीप वाघ, सखाराम लंके, निवृत्ती कुलकर्णी, मुसा परसुवाले, सतीश गायकवाड, लक्ष्मीबाई भुताडा, उज्वला फोपलीया, ॲड. अशफाक पठाण, बबनराव मगरे, शुभम टेकाळे, विजय जाधव, मेघराज चौधरी, लक्ष्मण सुपारकर, नागेश ढवळे, राधाबाई वाडेकर, दुर्गाताई देशमुख, सविता भोसले, आशा पवार, आशा कोळी, वंदना शहाणे, विमल शिंदे, कृष्णा डोंगरे, संदीप साबळे, रवी जाधव, सागर पाटील, महिंद्र मनसेवार, सौरभ भिसे, भूषण बनकर, अरुण काकडे, दीपक हवाले, लखन कणसे, शाहबाज खान, आकाश जगताप, माधव जाधव, माधव गायकवाड, सखाराम इंगळे, उत्कर्ष जोशी, विशाल जगधने, चंद्रशेखर निर्मल, फिटर खंदारे, भोला कांबळे, सुशिल भावसार, नेल्सन कांबळे, जीवन हातागळे, राजू गायकवाड, राजू पवार, अंकुश गायकवाड, किशोर शिंदे, घोडे पाटील, लक्ष्मण चव्हाण, सखाराम इंगळे, अंकुश शितोळे, भरत पिंपळे, हसराज बटावले, नीरज मंत्री, कृष्णा पांडव, सुनील साळवे, सुनील रत्नपारखे, भागवत गिराम, कुणाल जाधव, ज्ञानेश्वर लाकडे, संदीप घारे, तुकाराम लकडे, नरसिंग गोरे आदींची उपस्थिती होती. प्रसंगी युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदाताई ढगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांनी देखील मार्गदर्शन केले.

## काँग्रेस कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



या कार्यक्रमांमध्ये असंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर व युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णु पाचफुले यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेनेत प्रवेश केला. यामध्ये कुंबेफळ सिंदखेड येथील ग्रामपंचायतचे उपसरपंच भगवानराव खरात, कृष्णा खरात, व त्यांचे सहकारी कुलकर्णी निवृत्तीराव, बबन खरात तसेच श्रीकृष्णनगर येथील भरतराव इंगळे ग्रामपंचायत सदस्य, ज्ञानेश्वर लष्कर काँग्रेस कार्यकर्ते, दहिफळे येथील काँग्रेसचे माजी तालुका संघटक तथा ग्रामपंचायत सदस्य अशोक भानुदास राऊत, साळेगाव नेर येथील गुलाब चव्हाण आदी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. या सर्वांचे अर्जुनराव खोतकर यांनी शिवसेना पक्षात शाल व भगवा रुमाल पुष्पहार घालून स्वागत केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.